### महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचा आशावाद

# ‘प्रज्वला’ योजनेतून होईल महिलांचे सक्षमीकरण

। धुळे ✍ प्रतिनिधी ।

## प्रज्वला योजनेंतर्गत धुळे येथे महिला बचत गटांचा प्रशिक्षण वर्ग





राज्य शासनातर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी येथे केले. महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि राज्य शासन यांच्यातर्फे प्रज्वला योजनेंतर्गत महिला बचत गटांचा प्रशिक्षण वर्ग आज धुळे येथे आयोजित करण्यात आला होता. या वर्गाचे उद्घाटन श्रीमती रहाटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

» **यावेळी महापौर** चंद्रकांत सोनार, उपमहापौर कल्याणी अंपळकर, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, धुळे महानगरपालिका स्थायी समिती सभापती युवराज पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती निशा पाटील, नगरसेविका भारती माळी, महिला आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे, जिल्हा समन्वयक ड. चंद्रकांत येशीराव, माजी महापौर जयश्री अहिरराव, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियानाच्या जिल्हा समन्वयक त्रिवेणी भोंडे, नटविकास अधिकारी सुवर्णा पवार, महिला आर्थिक विकास महामंडळाचे समन्वयक हेमंत मदाणे आदी उपस्थित होते. श्रीमती मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची माहिती देताना सांगितले, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत अधिकाधिक बचत गटांनी सहभागी व्हावे. महापौर श्री. सोनार यांनी सांगितले, महिला बचतगटांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. श्रीमती ठाकरे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी बचत गटाच्या महिला सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बचत गटांना बाजार अन् वस्तूंची ऑनलाईन विक्री

» **श्रीमती रहाटकर** म्हणाल्या, महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या कायद्यांबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. संकटात सापडलेल्या महिलांसाठी महिला आयोग माहेर असून प्रशिक्षण, समुपदेशनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता प्रज्वला योजना राबविण्यात येईल. या योजनेत पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात बचत गटांची निवड करण्यात येईल. या योजनेत सहभागी होणाऱ्या बचत गटांचे जिल्हा - एक क्लस्टर तयार करण्यात येईल. त्यासाठी महिला सदस्यांना मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात येईल.

तिसऱ्या टप्प्यात या क्लस्टरमध्ये जे बचत गट सहभागी होणार नाहीत, त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने बचतगट बाजारांची निर्मिती करण्यात येईल. यासाठी महिला आयोगातर्फे अनुदान देण्यात येईल. राज्य शासन आणि महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू आणि पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

जनशक्ति Mon, 17 June 2019
epaper.ejanshakti.com/c/40444867

# योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

म. टा. वृत्तसेवा, धुळे

## महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकरांचा विश्वास

राज्य सरकार आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होईल, असा विश्वास राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि राज्य सरकारतर्फे प्रज्ज्वला योजनेअंतर्गत महिला बचतगटांचा प्रशिक्षण वर्ग शनिवारी (दि. १५) धुळे येथे आयोजित करण्यात आला होता. या वर्गाचे उद्‌घाटन रहाटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.



या वेळी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर कल्याणी अंपळकर, प्रज्ज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, स्थायी समिती सभापती युवराज पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती निशा पाटील, नगरसेविका भारती माळी, आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे आदी उपस्थित होते.

महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या कायद्यांबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. संकटात सापडलेल्या महिलांसाठी महिला आयोग माहेर असून प्रशिक्षण, समुपदेशनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत असल्याचे रहाटकर यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून आता प्रज्ज्वला योजना राबविण्यात येत असून, योजनेत पहिल्या टप्प्यात बचतगटांच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. तर दुसऱ्या टप्प्यात बचतगटांची निवड करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. या योजनेत सहभागी होणाऱ्या बचतगटांचे जिल्हा एक क्लस्टर तयार करण्यात येईल. त्यासाठी महिला सदस्यांना मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात या क्लस्टरमध्ये जे बचतगट सहभागी होणार नाहीत, त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने बचतगट बाजारांची निर्मिती करण्यात येईल. यासाठी महिला आयोगातर्फे अनुदान देण्यात येईल. राज्य शासन आणि महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू आणि पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# प्रज्वल योजनेतून महिलांचे सक्षमीकरण

## महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे प्रतिपादन



**प्रतिनिधी/** १६ जून

**धुळे** : राज्य शासनातर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होईल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी येथे केले.

महिला बचत गटांचा प्रशिक्षण वर्ग आज धुळे येथे आयोजीत करण्यात आला होता. या वर्गाचे उद्घाटन श्रीमती रहाटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर कल्याणी अंपळकर, प्रज्ज्वला योजनेच्या अध्यक्षा दिपाली मोकाशी, धुळे महानगरपालिका स्थायी समिती सभापती युवराज पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती निशा पाटील, नगरसेविका भारती माळी, महिला आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे, जिल्हा समन्वयक ॲड. चंद्रकांत येशीराव, माजी महापौर जयश्री अहिरराव, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियानाच्या जिल्हा समन्वयक त्रिवेणी मोडे, गटविकास अधिकारी सुवर्णा पवार, महिला आर्थिक विकास महामंडळाचे समन्वयक हेमंत मदाणे आदी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या कायद्याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. संकटात सापडलेल्या महिलांसाठी महिला अयोग माहेर असून प्रशिक्षण, समूपदेशनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता प्रज्ज्वला योजना राबविण्यात येईल. या योजनेत पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येईल दुसऱ्या टप्प्यात बचत गटांची निवड करण्यात येईल.

या योजनेत सहभागी होणाऱ्या बचत गटाचे जिल्हा एक क्लस्टर तयार करण्यात येईल. त्यासाठी महिला सदस्यांना मार्केटींगचे प्रशिक्षण देण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात य क्लस्टरमध्ये जे बचत गट सहभागी होणार नाहीत

ePaper देशोन्नती
Mon, 17 June 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/40445071

लोकमत

# महिला सक्षमीकरणाची गरज

## विजया रहाटकर : महिला बचत गट प्रशिक्षणावेळी प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** राज्य शासनातर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि राज्य शासन यांच्यातर्फे प्रज्ज्वला योजनेंतर्गत महिला बचत गटांचा प्रशिक्षण वर्ग आज धुळे येथे आयोजित करण्यात आला होता. या वर्गाचे उद्घाटन श्रीमती रहाटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर कल्याणी अंपळकर, प्रज्ज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, सभापती युवराज पाटील, निशा पाटील, भारती माळी, देवयानी ठाकरे, चंद्रकांत येशीराव, जयश्री अहिरराव, त्रिवेणी भोंडे, सुवर्णा पवार आदी उपस्थित होते. श्रीमती रहाटकर म्हणाल्या, महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या कायद्यांबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. संकटात सापडलेल्या महिलांसाठी महिला आयोग माहेर असून प्रशिक्षण, समुपदेशनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. महिला बचतगटांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. श्रीमती ठाकरे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.




बचत गटांच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विजया हटकर.

### बचत गटांना अनुदान उपलब्ध होणार

**महिला सदस्यांना मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात या क्लस्टरमध्ये जे बचत गट सहभागी होणार नाहीत, त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने बचतगट बाजारांची निर्मिती करण्यात येईल. यासाठी महिला आयोगातर्फे अनुदान देण्यात येईल. राज्य शासन आणि महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू आणि पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून ऑनलाइन पोर्टल सुरु करण्यात येईल.**

**प्रशिक्षण** • बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी लवकरच ऑनलाइन पोर्टल

# प्रज्वला योजनेतून बचत गटांतील महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य

## बचत गटांना मार्केटिंग करण्याची दिली जाणार माहिती

### महिला आयोग अध्यक्षा रहाटकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | धुळे

राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. प्रज्वला योजनेतून बचत गटांतील महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला जाणार आहे. तसेच राज्य शासन आणि महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येणार असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

राज्य महिला आयोग आणि राज्य शासनातर्फे प्रज्वला योजनेंतर्गत बचत गटांतील महिलांसाठी रविवारी विशेष प्रशिक्षण शिबिर झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर कल्याणी अंपळकर, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, महापालिका स्थायी समितीचे सभापती युवराज पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निशा पाटील, नगरसेविका भारती माळी, महिला आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे, जिल्हा समन्वयक अॅड. चंद्रकांत येशीराव, माजी महापौर जयश्री अहिरराव, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या जिल्हा समन्वयक त्रिवेणी भोंदे, सहायक गटविकास अधिकारी सुवर्णा पवार, महिला आर्थिक विकास महामंडळाचे समन्वयक हेमंत भदाणे आदी उपस्थित होते. विजया रहाटकर म्हणाल्या की, राज्य शासनातर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिलांसाठी करण्यात आलेल्या कायद्यांवर जनजागृती केली जात आहे. संकटात सापडलेल्या महिलांचे समुपदेशन केले जाते. या अभियानाचा एक भाग म्हणून आता प्रज्वला योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात बचतगटाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात बचत गटांची निवड करण्यात येईल. या योजनेत सहभागी होणाऱ्या बचत गटांचे जिल्हास्तरावर एक क्लस्टर तयार करण्यात येईल. त्या माध्यमातून महिलांना मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात या क्लस्टरमध्ये जे बचत गट सहभागी होणार नाहीत, त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने बचत गट बाजाराची निर्मिती करण्यात येईल. त्यासाठी महिला आयोगातर्फे अनुदान देण्यात येईल. राज्य शासन आणि महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी दीपाली मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची तर देवयानी ठाकरे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. या वेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर महिला आयोगातर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली.



शिबिरात मार्गदर्शन करताना विजया रहाटकर. शेजारी दीपाली मोकाशी, जयश्री अहिरराव यांच्यासह मान्यवर.



प्रशिक्षण शिबिराला उपस्थित असलेल्या बचत गटातील महिला.

### महिलांना प्रशिक्षण

प्रज्वला योजनेच्या माध्यमातून बचत गटांतील महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बचत गटांच्या महिलांना सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील महिलांकडून सामाजिक, आर्थिक आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी दीपाली मोकाशी यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीत शल्का साळवी, मीनल मोहाडीकर, उषा वाजपेयी, स्मिता परचुरे, कपालिनी सिनकर यांचा समावेश आहे. शहरातील कार्यक्रमानंतर शिंदखेडा येथेही कार्यशाळा झाली.